**दिनांक 24/07/2020 रोजी मा. अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अपर जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलिस अधिक्षक रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 10. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 11. | उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 12. | सहाय्यक आयुक्त मत्सयव्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 13. | पत्तन अभियंता रत्नागिरी पत्तन विभाग रत्नागिरी | सदस्य |
| 14. | डॉ. एस. सी. ठाकूरदेसाई, उपप्राचार्य गोगटे जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी | सदस्य |
| 15. | उपअभियंता, सा.बां. उपविभाग गुहागर | |
| 16. | मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर | |
| 17. | श्री. जोशी, विधी अधिकारी रत्नागिरी | |
| 18. | श्री. समाधान बबन जगदाळे रचना सहाय्यक गुहागर न.पं. | |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

सागरी किनारा असलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती स्थापन करण्याबाबत पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीझेडएमए 2011/सीआर-6/एमसीझेडएमए दिनांक 23/03/2011 ने कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती गठीत करण्यात आली आहे.

मा. सदस्य सचिव यांनी सदर जिल्हा स्तरीय समितीला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोणकोणते कामकाज करावयाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

1. अनधिकृत बांधकामे होऊ न देणे तसेच

2. सागरी पर्यावरणाच्या बाबत सुरक्षा व चांगल्या त-हेच्या धारणांच्या बाबतीत तसेच प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.
3. नागरीकांच्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करणे.

सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढणेची आहेत.

## गुहागर नगर पंचायत क्षेत्रात येणा-या अनधिकृत बांधकामाबाबत -

सीआरझेड नियमांचे उल्लंघन करुन केलेल्या बांधकामाबाबत मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी कोणती कारवाई केली याबाबत अध्यक्ष यांनी विचारणा केली. त्यावर मुख्याधिकारी न.पं. गुहागर यांनी सीआरझेड I, II, III असे वर्गीकरण करुन यादी तयार केली असुन बांधकाम धारकास प्राथमिक नोटिस काढणेत आली असलेबाबत सांगितले. मुख्याधिकरी, नगर पंचायत गुहागर यांनी 200 मीटर मध्ये निवासी घरांचे बांधकाम येत आहे अगर कसे? याबाबत साशंकता असलेबाबत सांगितलेवर अध्यक्ष यांनी तुमचेकडील नगर रचनाकार, सर्व्हेअर यांची मदत घेऊन कारवाई करणेबाबत सांगितले.

## मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांजकडील प्रलंबित प्रकरणांबाबत -

श्री. बळवंत मुरलीधर परचुरे, रा. देवपाट गुहागर ता. गुहागर जि. रत्नागिरी यांनी मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांजकडे मौजे गुहागर ता. गुहागर जि. रत्नागिरी येथील खाली नमुद केलेल्या प्रकरणामध्ये दावा दाखल केला आहे -

| अ.क्र. | दावा क्रमांक | दाव्याचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | 36/2018 | व्हु गॅलरीचे अनधिकृत बांधकाम केलेबाबत |
| 2 | 37/2018 | सीआरझेड III मध्ये अनधिकृत हॉटेल यांचे बांधकाम केलेबाबत |
| 3 | 135/2017 | जेट्टीचे अनधिकृत बांधकाम केलेबाबत |

उपरोक्त प्रकरणांमध्ये MCZMA ने त्यांचेकडील दिनांक 21/04/2020, 29/06/2020 व 01/07/2020 चे पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम हटविण्याची कारवाई करण्याचे अधिकार डीसीझेडएमएला दिले गेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा Action Taken Report अहवाल सादर करणेबाबत MCZMA ने जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

उपरोक्त तीनही प्रकरणांमध्ये मा. हरित न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाचे अवलोकन करण्यात येवून, संबंधित विभागांनी त्यानुसार विनाविलंब कार्यवाही करावी. **मा. हरित न्यायाधिकरणाचे आदेशाची अवमान्यता होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.** उपरोक्त दाव्यांमध्ये करावयाच्या कारवाईबाबत चर्चा करुन पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

## Original Application No. 135/2017 -

**Original Application No. 135/2017** या दाव्यात 16/03/2020 रोजी झालेल्या सुनावणी आदेशाचे वाचन करण्यात आले.

सदर दाव्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र क्र. मह/कार्या-अ.का-06/WZ/135/2017 दिनांक 18/08/2017 अन्वये जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे वतीने म्हणणे सादर करणेकामी पत्तन अभियंता, पत्तन विभाग रत्नागिरी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी मार्फत बारावा वित्त आयोग-सागरी किनारा व सृष्टी पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत गुहागर येथे समुद्र किनारी जेट्टी बांधणे या कामासाठी मंजुर केलेल्या अनुदानाचे निधी वितरण सन 2011-12 दिनांक 11/10/2011 च्या आदेशामध्ये " वन कायदा व सीआरझेड कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची खात्री करणेची जबाबदारी कार्यान्वयीण यंत्रणेची आहे " अशी अट क्र. 5 मध्ये नमुद आहे. परंतू सदर अटीबाबत प्रतिज्ञापत्रामध्ये कोणताही उल्लेख पत्तन अभियंता, पत्तन विभाग रत्नागिरी यांनी केलेला दिसून येत नाही. पत्तन अभियंता, पत्तन विभाग रत्नागिरी यांनी जाणून-बुजून सदरची बाब मा. हरीत न्यायाधिकरणाचे निदर्शनास आणून दिलेली नाही. तरी याबाबत पत्तन अभियंता यांचा लेखी खुलासा घेण्यात यावा अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

प्रस्तुत दाव्याकामी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे वतीने प्रतिज्ञापत्र/म्हणणे सादर करणेकामी उपविभागीय अधिकारी चिपळुण, उपविभाग चिपळुण यांना प्राधिकृत करण्याचे पत्र तयार करावे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच उपविभागीय अधिकारी चिपळुण, उपविभाग चिपळुण यांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे वतीने आपले म्हणणे/ प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीचे तारखेपुर्वी सादर करावे व तसे या कार्यालयास अवगत करावे. तसेच पत्तन अभियंता, पत्तन विभाग रत्नागिरी व उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी केलेली कार्यवाही सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए यांना कळवावी.

## Original Application No. 36/2018 -

**Original Application No. 36/2018** बाबत दिनांक 16/03/2020 रोजीच्या सुनावणी आदेशाचे वाचन करण्यात आले.

सदर प्रकरणांमध्ये मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांनी दिनांक 16/03/2020 रोजी सुनावणी आदेश पारित केला होता. सदर सुनावणी आदेशामध्ये केवळ प्रतिवादी क्र. 3 - MCZMA हजर राहिले आहेत. **सदर Original Application (O.A) 36/2018 मध्ये " या न्यायाधिकरणाने योग्य किंवा अयोग्य असे ठरविणेस काहीही बाकी राहिलेले नाही. फक्त अनधिकृत बांधकाम पाडण्याचे निर्देश/आदेश देणे बाकी राहणार आहे.** परंतु पुढील आदेश पारित करणेपूर्वी या पीठासनासमोर (Respondent) उत्तरार्थी क्र. 1 व 2 यांची उपस्थिती आवश्यक आहे. कारण **Viewing Gallery हा PWD चा Project होता."** असे नमुद केले आहे.

प्रकरणी उत्तरार्थी क्र. 1 उपअभियंता, सा.बां. विभाग गुहागर व उत्तरार्थी क्र. 2 उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण हे न्यायालयात हजर झाले होते अगर कसे? याची विचारणा अध्यक्ष यांनी संबंधितांना केली. त्यावरुन उत्तरार्थी क्र. 1 व 2 यांनी Online प्रतिज्ञापत्र/म्हणणे मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांना सादर केले असुन दिनांक 20/07/2020 रोजीच्या सुनावणी आदेशामध्ये सदर

प्रतिज्ञापत्राचा विचार करण्यात आला आहे असे सांगितले व दिनांक 20/07/2020 रोजीचा सुनावणी आदेश पाहून त्याची खात्री करण्यात आली.

दिनांक 20/07/2020 रोजीचा सुनावणी आदेशामधील मुद्दा क्र. 19 (iii) मध्ये पुढील प्रमाणे नमुद केले आहे -

**"To ensure that the illegal construction which is in violation of the rules and without the clearance sought by the MCZMA be demolished immediately without any delay and say not more than 15 days from the date of communication of the order. The Registry is directed to communicate the order by e-mail to the Chief Secretary immediately."**

तरी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग गुहागर यांनी **सीआरझेड अधिसूचना 2011 व 2019 यामधील तरतूदी** व **मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांजकडील दिनांक 20/07/2020 रोजीच्या निर्देशानुसार वरीलप्रमाणे निष्कासनाची कारवाई करणे आवश्यक आहे, असे अध्यक्ष यांनी सांगितले.**

तथापि तत्पुर्वी मा. हरित न्यायाधिकरणाचे दिनांक 16/03/2020 रोजीचे आदेशानुसार **उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण** यांनी, केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांचे मार्गदर्शनानुसार **पर्यावरणाची नुकसान भरपाई मुल्यांकन** करुन तात्काळ अहवाल उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सादर करावा. तसेच **बेकायदेशीर बांधकाम काढणेचा व ती जागा पुर्ववत करणेचा खर्च** उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सादर करावा.

तसेच दिनांक 20/07/2020 रोजीच्या सुनावणी आदेशाची प्रत तात्काळ मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना ईमेल द्वारे तसेच नोंदणीकृत टपालाने सादर करणेत यावी असे निर्देश सदस्य सचिव यांनी दिले.

## <u>Original Application No. 37/2018 -</u>

<u>Original Application No. 37/2018</u> बाबत दिनांक 16/03/2020 रोजीच्या सुनावणी आदेशाचे वाचन करण्यात आले.

प्रस्तुत दाव्यामध्ये पारंपारिक समाजाव्यतिरिक्त (Non-traditional) CRZ Notification 1991 व 2011 चा भंग करुन उच्चतम भरती रेषेपासून 500 मीटरच्या आत व तळ मजला + पहिला मजला या करिता मान्यता असलेल्या 9 मीटर पेक्षा जास्त उंचीचे बांधकाम केले गेले आहे, अशा प्रकरणांमध्ये खालील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण व मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांना निर्देश देण्यात आले आहेत -

1. CRZ Notification 1991 व 2011 चा भंग करुन पारंपारिक समाजाव्यतिरिक्त व्यक्तीनी केलेले बांधकाम व 9 मीटर पेक्षा जास्त उंचीचे बांधकाम अशा दोन प्रकारानुसार यादया बनविणेत याव्यात.

2. तद्नंतर सदर बांधकाम धारक यांना नोटिसा निर्गमित कराव्यात व आवश्यक परवानगींची पुर्तता बांधकामधारक यांजकडून करण्यात आली आहे अगर कसे? याची पडताळणी करावी.

3. CRZ Notification 1991 व 2011 व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52 व 53 तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील कलम 19 चे तरतूदीनुसार बांधकाम निष्कासित करणेचा कार्यक्रम तयार करणेत यावा.

4. उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी केलेली कार्यवाही व वेळोवेळी होणारी प्रगती याबाबत या कार्यालयास व मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांना अवगत करावे.

**मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांचे दिमांक 20/07/2020 रोजीचे आदेशानुसार मुद्दा क्र. 19 बाबत कार्यवाहीचा अहवाल तात्काळ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून घेणेच्या सूचना उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना देणेत आल्या.**

## MCZMA/नागरिकांकडुन प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत -

सदस्य सचिव यांनी उपविभाग निहाय तक्रारी यादीचे वाचन केले. उपविभाग निहाय तक्रारींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | उपविभागाचे नांव | प्रलंबित तक्रारींची संख्या |
|---|---|---|
| 01 | रत्नागिरी | 8 |
| 02 | राजापूर | 4 |
| 03 | चिपळूण | 7 |
| 04 | दापोली | 12 |
| | **एकुण** | **31** |

सर्व उपविभागीय अधिकारी यांनी पुढील बैठकीचे पुर्वी वरील तक्रारींसंदर्भात सदयस्थितीबाबत अथवा केलेल्या कार्यवाहीबाबत प्रकरणनिहाय या कार्यालयास अवगत करावे असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या कार्यालयाचे दिनांक 15/07/2016 रोजीचे आदेशानुसार सीआरझेड नोटिफिकेशननुसार कार्यवाही करणेचे अधिकार सर्व उपविभागीय अधिकारी यांना प्रदान केलेचे पुनश्च सर्व उपविभागीय अधिकारी यांना निदर्शनास आणून देणेत आले.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेलया बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार या कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहा. संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या. तसेच समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष, महाराष्ट्र सागरी किनारा प्रक्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना सादर करावे असे निर्देश देवुन व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(बाबासाहेब बेलदार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/07/2020
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 27/07/2020

प्रतिलिपी - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 24/07/2020 रोजी मा. अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अपर जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलिस अधिक्षक रत्नागिरी | सदस्य |
| 4. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 5. | सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 7. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 9. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 10. | उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय टास्क फोर्स समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5 प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सीआरझेड अधिसूचना 1991 व 2011 च्या तरतूदींचे उल्लंघन करणा-या बाबींचे सर्व्हेक्षण करुन तरतूदींचा भंग झाला असल्यास त्यावर कार्यवाही करणेची आहे.

1. विनापरवाना बांधकाम प्रकरणे शोधणे.
2. पर्यावरण खात्याची परवानगी न घेतलेली परंतु इतर खात्याची परवानगी घेऊन पुर्ण झालेली अगर अपूर्ण बांधकामे शोधणे.
3. पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली परंतु अटी व शर्तीचा भंग झालेली प्रकरणे शोधणे.

## <u>सीआरझेड नियमांचे पालन संबंधित जमीनमालक/ जमीन विकासक यांचेकडून झाले किंवा कसे याची पाहणी पथकाकडून करुन अनुसूची अ व ब प्रमाणे माहिती सादर करण्याबाबत</u> -

सागरी किनारी होणा-या बांधकामांचे बाबतीत वेळोवेळी प्रचलित सीआरझेड नियमांचे पालन संबंधीत जमिन मालक/ विकासक यांचेकडून झाले आहे किंवा कसे याची पहाणी करणे आवश्यक असलेमुळे या कार्यालयाकडील दिनांक 13/01/2014 च्या आदेशान्वये तपासणी पथकांची नियुक्ती करणेत आली होती.

सदर पथकाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच पथकांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले -

1. पथकांमध्ये नगर रचनाकार व भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असुन तांत्रिक बाबींमध्ये त्यांचे सहाय्य घेणेचे आहे.
2. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 18 नुसार नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांना नियोजन प्राधिकरण नेमलेले आहे. तरी नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांनी सीआरझेड नियमांचे उल्लंघन होते अगर कसे? याची पडताळणी करणेची आहे.
3. गामीण भागातील बांधकामाचे बाबतीत उपविभागीय अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे तसेच तांत्रिक बाबीमध्ये सहाय्यक संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत.

उपविभागीय अधिकारी यांनी सर्व्हेक्षण पथकांचा अहवाल पुढील बैठकीचे पुर्वी सादर करणेचा आहे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या. तसेच समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष, महाराष्ट्र सागरी किनारा प्रक्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना सादर करावे असे निर्देश देवुन व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/टास्कफोर्स/07/2020
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 27/07/2020

**(बाबासाहेब बेलदार)**
**अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी**

प्रतिलिपी - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 15/09/2020 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलिस अधिक्षक रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 6. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 8. | सहाय्यक आयुक्त मत्सयव्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 9. | पत्तन अभियंता रत्नागिरी पत्तन विभाग रत्नागिरी | सदस्य |
| 10. | प्रतिनिधी उपअभियंता, सा.बां. उपविभाग गुहागर | |
| 11. | कनिष्ठ अभियंता, सा.बां. उपविभाग गुहागर | |
| 12. | मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर | |
| 13. | श्री. जोशी, विधी अधिकारी रत्नागिरी | |
| 14. | श्री. समाधान बबन जगदाळे रचना सहाय्यक गुहागर न.पं. | |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

सागरी किनारा असलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती स्थापन करण्याबाबत पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीझेडएमए 2011/सीआर-6/एमसीझेडएमए दिनांक 23/03/2011 ने कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती गठीत करण्यात आली आहे.

मा. सदस्य सचिव यांनी सदर जिल्हा स्तरीय समितीला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोणकोणते कामकाज करावयाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

1. अनधिकृत बांधकामे होऊ न देणे तसेच
2. सागरी पर्यावरणाच्या बाबत सुरक्षा व चांगल्या त-हेच्या धारणांच्या बाबतीत तसेच प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.
3. नागरीकांच्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करणे.

सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढणेची आहेत. सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करणेत आली.

**<u>विषय क्र. 1 : मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांजकडील प्रलंबित प्रकरणांबाबत</u>**

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (मुख्य बेंच दिल्ली), पश्चिम प्रदेश खंडपीठ पुणे यांजकडे अर्जदार श्री. बळवंत मुरलीधर परचुरे यांनी खालीलप्रमाणे दावे दाखल केलेले आहेत.

| अ.क्र. | दावा क्रमांक | दाव्याचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | 36/2018 | व्हु गॅलरीचे अनधिकृत बांधकाम केलेबाबत |
| 2 | 37/2018 | सीआरझेड III मध्ये अनधिकृत बांधकामे, अनधिकृत हॉटेल/रिसॉर्ट यांचे बांधकामाबाबत |
| 3 | 135/2017 | जेट्टीचे अनधिकृत बांधकाम केलेबाबत |

उपरोक्त प्रकरणांमध्ये मा. अध्यक्ष, MCZMA ने त्यांचेकडील दिनांक 21/04/2020, 29/06/2020 व 01/07/2020 चे पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम हटविण्याची कारवाई करण्याचे अधिकार डीसीझेडएमएला दिले गेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा Action Taken Report अहवाल सादर करणेबाबत मा. अध्यक्ष, MCZMA ने जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

उपरोक्त तीनही प्रकरणांमध्ये मा. हरित न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाचे अवलोकन करण्यात येवून, संबंधित विभागांनी त्यानुसार विनाविलंब कार्यवाही करावी व **मा. हरित न्यायाधिकरणाचे आदेशाची अवमान्यता होणार नाही याची दक्षता घेणेबाबत संबंधितांना दिनांक 24/07/2020 रोजी झालेल्या** जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती व टास्क फोर्स समितीच्या सभेमध्ये निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त दाव्यांच्या सदयस्थितीबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात येवून सूचना देण्यात आल्या -

**I. <u>Original Application No. 135/2017 -</u>**

उपरोक्त प्रकरणी मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव एमसीझेडएमए यांजकडील पत्र क्र. एनजीटी 2020/सीआर-1/टीसी-4 दिनांक 29/07/2020 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मौजे गुहागर ता. गुहागर येथील अनधिकृत जेट्टीचे बांधकाम निष्कासित करणेबाबत पत्तन अभियंता रत्नागिरी यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. महसूल/कार्या अे.के.-6/NGT/135-2017 दिनांक : 03/08/2020 चे पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग यांनी दिनांक 09/09/2020 चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे -

" मौजे गुहागर ता. गुहागर येथील अनधिकृत जेट्टीचे बांधकाम पाडण्याचे काम 31 ऑगस्ट 2020 रोजी सकाळी 10.30 वाजता जेसीबी या यंत्रणेने सुरु करण्यात आले आहे व अंशत: जेट्टी निष्कासित करण्यात आली आहे. सोबत छायाचित्र जोडण्यात आले आहे. तसेच सदर जेट्टी समुद्रात असून सदयस्थितीत पावसाळयामुळे समुद्रात मोठया प्रमाणात उधाण येत असते. तसेच अशा काळात मजूर व मशिनरीची वाहतूक ही अत्यंत जिकरीची होते. तरी सदर प्रकरणी जिवीतहानी टाळण्याकरिता समुद्र शांत झाल्यावर माहे ऑक्टोबर नंतर जेट्टी पाडणे संयुक्तीक होईल. असा अहवाल पत्तन अभियंता, रत्नागिरी, पत्तन ~~अभियंता~~ विभाग यांनी

या कार्यालयाकडे सादर केला आहे. त्यानुसार वस्तुस्थिती मा. अध्यक्ष, MCZMA यांना कळविणेत आली आहे.

उपरोक्त दाव्याचे प्रकरणी दिनांक 18/09/2020 रोजी मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम प्रदेश खंडपीठ, मुख्य बेंच दिल्ली यांजकडे सुनावणीची तारीख नेमणेत आली आहे. मा. न्यायाधिकरणास सदयस्थितीचा अहवाल सादर करणेकामी प्रस्तुत प्रकरणी शासनाचे वतीने प्रतिज्ञापत्र दाखल करणेचे असलेमुळे उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी या कार्यालयाकडून मान्यता दिलेले प्रतिज्ञापत्र मा. न्यायाधिकरणास दाखल करावे अश्या सूचना देणेत आल्या.

पत्तन अभियंता रत्नागिरी, पत्तन विभाग रत्नागिरी यांनी मौजे गुहागर ता. गुहागर येथील अनधिकृत जेट्टीचे बांधकाम निष्कासीत करणेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले आहे. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचेमार्फत केवळ विकास कामांना निधी वितरीत करण्यात येत असुन मौजे गुहागर येथील जेट्टीचे बांधकाम निष्कासीत करणेसाठी येणा-या खर्चाबाबत जिल्हा नियोजन समिती मार्फत निर्णय घेता येवु शकत नाही. तरी मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, मुख्य बेंच दिल्ली यांचेमार्फत खर्चाच्या वसुलीबाबत जो सुनावणी आदेश पारीत करण्यात येईल त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असलेबाबत अध्यक्ष यांनी सांगितले.

मौजे गुहागर, ता. गुहागर येथील अनधिकृत जेट्टीचे बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असुन निष्कासीत बांधकामाचा मलबा त्याच ठिकाणी ठेवणेत आलेला आहे असे उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांनी सांगितले. त्यावर अध्यक्ष यांनी जेट्टीचे निरुपयोगी साहित्य/मलबा CRZ क्षेत्राचे बाहेर टाकणेबाबत पत्तन अभियंता, रत्नागिरी यांना निर्देश दिले. पत्तन अभियंता, रत्नागिरी यांनी निरुपयोगी साहित्य/मलबा हे CRZ क्षेत्राचे बाहेर त्वरीत हलविण्यात येईल असे सांगितले.

## II. <u>Original Application No. 36/2018 -</u>

**मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, मुख्य बेंच दिल्ली** यांनी **दिनांक 20/07/2020 रोजीचे सुनावणी आदेशातील मुद्दा क्र. 19(3) अन्वये व्हु गॅलरीचे अनधिकृत बांधकाम आदेशाचे दिनांकापासून 15 दिवसांमध्ये निष्कासित करावयाचे आहे** असे आदेश पारित केले आहेत.

सदर प्रकरणी मा. संचालक, पर्यावरण, पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक 29/07/2020 रोजीचे पत्रान्वये, मौजे गुहागर ता. गुहागर येथील व्हु गॅलरीचे अनधिकृत बांधकाम मा. न्यायाधिकरणाने पारित केलेल्या दिनांक 20/07/2020 रोजीच्या सुनावणी आदेशान्वये तात्काळ निष्कासित करावे असे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी चिपळुण, उपविभाग चिपळूण यांनी व्हयू गॅलरीचे बांधकाम निष्कासीत केलेबाबत उप अभियंता, सा.बां. उपविभाग गुहागर यांचा अहवाल, छायाचित्रीकरणाची सीडी व छायाचित्र यासह अहवाल मा. अध्यक्ष, MCZMA यांना सादर केला आहे. तसेच उपरोक्त दावा प्रकरणी कार्यवाही पुर्ण झालेचे अंतिम कार्यवाहीचे प्रतिज्ञापत्र उपविभागीय अधिकारी चिपळुण, उपविभाग चिपळूण यांनी मा. न्यायाधिकरणास दाखल केले आहे.

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच दिल्ली यांनी दिनांक 07/09/2020 रोजीचे सुनावणी आदेशात मुद्दा क्र. 5 व 6 मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे :

> **5. So far as the disciplinary action against the delinquent officials is concerned, we leave it to the Chief Secretary, State of Maharashtra to proceed in accordance with law.**
> **6. The Original Application No. 36/2018 (WZ) is disposed of accordingly.**

मा. न्यायाधिकरणाने त्यांचे सुनावणी आदेशात नमुद केलेप्रमाणे **संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कायदयानुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जबाबदारी सोपवुन दावा निकाली ठेवला आहे. तरी त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही पुर्ण करणेबाबत सूचना अध्यक्ष यांनी दिल्या**

## III. Original Application No. 37/2018 -

प्रस्तुत दाव्यामध्ये पारंपारिक समाजाव्यतिरिक्त (Non-traditional) CRZ Notification 1991 व 2011 चा भंग करुन उच्चतम भरती रेषेपासून 500 मीटरच्या आत व तळ मजला + पहिला मजला या करिता मान्यता असलेल्या 9 मीटर पेक्षा जास्त उंचीचे बांधकाम केले गेले आहे, अशा प्रकरणांमध्ये कार्यवाही करणेबाबत **उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण व मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर** यांना **दिनांक 24/07/2020 रोजी झालेल्या जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती (DCZMA) व टास्क फोर्स समितीच्या सभेमध्ये** पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

1. CRZ Notification 1991 व 2011 चा भंग करुन पारंपारिक समाजाव्यतिरिक्त व्यक्तीनी केलेले बांधकाम व 9 मीटर पेक्षा जास्त उंचीचे बांधकाम अशा दोन प्रकारानुसार यादया बनविणेत याव्यात.
2. तदनंतर सदर बांधकाम धारक यांना नोटिसा निर्गमित कराव्यात व आवश्यक परवानगींची पुर्तता बांधकामधारक यांजकडून करण्यात आली आहे अगर कसे? याची पडताळणी करावी.
3. CRZ Notification 1991 व 2011 व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52 व 53 तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील कलम 19 चे तरतूदीनुसार बांधकाम निष्कासित करणेचा कार्यक्रम तयार करणेत यावा.
4. उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी केलेली कार्यवाही व वेळोवेळी होणारी प्रगती याबाबत या कार्यालयास व मा. हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांना अवगत करावे.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी चिपळुण यांनी दिनांक 31/08/2020 रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे :

मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी नगर पंचायत स्तरावर सर्वेक्षण सुरु केले असुन सुरुवातीस वाणिज्य स्वरुपाच्या 23 बांधकाम धारकांची माहिती संकलित केलेली आहे. मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी संबंधित बांधकाम धारक यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम

53(1) अन्वये वर नमुद वाणिज्य स्वरुपाच्या 23 बांधकाम धारकांवर दिनांक 21/08/2020 रोजी बांधकाम एक महिन्याच्या आत जमिनदोस्त करण्याबाबत व तसे न केल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई करणेत येईल अशा स्वरुपाची कायदयातील तरतूदीनुसार नोटीसांची बजावणी केली असून त्याबाबतचा अंतरीम अहवाल सादर केलेला आहे.

मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांनी सादर केलेल्या वर नमुद वाणिज्य स्वरुपाच्या बांधकाम धारकांविरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 नुसार कार्यवाही सुरु करण्यात आली असुन दिनांक 28/08/2020 रोजी गुहागर येथील मे. न्यायदंडाधिकारी वर्ग-1 यांचे कोर्टात एकूण 5 असामीं विरुध्द फिर्याद दाखल करण्यात आलेल्या आहेत, असा अहवाल उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी या कार्यालयास सादर केला आहे.

प्रस्तुत दाव्याकामी मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच नवी दिल्ली यांनी दिनांक 07/09/2020 रोजीचे सुनावणी आदेशान्वये खालीलप्रमाणे आदेश पारित केले असुन मुद्दा क्र. 3 ते 7 मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे -

3. Inspite of the fact that the construction was found to be in violation of CRZ Notification. The authorities failed to proceed in accordance with the law.

4. The matter requires serious consideration as to whether the State Authorities are complying the directions as contained in CRZ Notification or not. As per inspection report, 23 unauthorised construction were reported which are in violation of CRZ Notification 1991 and 2011 and the authorities are not complying the CRZ direction.

5. When the law protector becomes the law violators, how law will be protected. The basic principle of rule of law is to follow rule/ law 3 and not to break or violate it. For the negligence of those to whom public duties have been entrusted can never be allowed to cause public mischief. Public servants if committing wrong in discharge of statutory functions and later on if it was found not be in accordance with law within the knowledge of the officer concerned then it cannot be said to be the work and duty within the definition of State Act.

6. The rules as provided in National Green Tribunal Act, 2010 provides that the matters filed before the Tribunal be decided within a time framed but due to heavy pendency and backlog, it is not feasible. Accordingly, we are of the view that the matter should be transferred to the Principal Bench of this Tribunal for quick disposal and to further decide the matter as to simply filing the complaint case fulfills the requirement of compliance of CRZ Notification and as to whether the Executive authorities are at liberty to permit the unauthorized construction within their jurisdiction which is found to be in violation of CRZ Notification. Accordingly, we request and direct the Registry to place the matter before Hon'ble the Chairperson for transferring this case to Principal Bench of this

**Tribunal at New Delhi. Since the matter is being heard on Video Conference, thus, none has any objection.**

**7. List the matter on 14.09.2020 for hearing or for listing for hearing.**

वर मुद्दा क्र. 6 मध्ये नमुद केलेप्रमाणे वर नमुद केलेला दावा हा मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच दिल्ली यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण मुख्य बेंच दिल्ली येथे दिनांक 14/09/2020 रोजी सुनावणी झाली असुन सुनावणीमध्ये काय चर्चा झाली याबाबत सदस्य सचिव यांनी विचारणा केलेवर उपविभागीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली आहे :

ओरिजिनल ॲप्लीकेशन क्र. 37/2018 मधील अर्जदार श्री. बळवंत मुरलीधर परचुरे यांनी मौजे गुहागर येथे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाची एकुण 86 प्रकरणे असुन सदरच्या प्रकरणांबाबत अर्जदार यांना तत्कालीन मुख्याधिकारी, गुहागर नगर पंचायत यांनी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सामनेवाला क्र. 2 व 3 चे वतीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात केवळ 23 अनधिकृत बांधकामांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

मुख्याधिकारी नगर पंचायत गुहागर यांनी माहितीच्या अधिकारामध्ये अनधिकृत बांधकामांबाबत जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीची पडताळणी करुन मुद्दा क्र. 1 ते 4 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करुन त्वरीत यादी तयार करावी. तसेच सदरची यादी उपविभागीय अधिकारी चिपळुण, उपविभाग चिपळुण यांना उपलब्ध करुन दयावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

## 2. गुहागर नगर पंचायतीचे क्षेत्र CRZ III मधून CRZ II मध्ये वर्ग करणेबाबत -

मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांनी गुहागर नगर पंचायतीला नागरी दर्जा प्राप्त होवून देखील गुहागर नगरपंचायत कार्यक्षेत्र सीआरझेड II मध्ये समाविष्ट करणेत आलेले नाही. तसेच केंद्र सरकारच्या सीआरझेड राजपत्र 2019 अन्वये बनविणेत आलेले अंतिम होणेपुर्वीचे (Draft) सीआरझेड नकाशे यामध्येही सदर क्षेत्र सीआरझेड II मध्ये समाविष्ट करणेत आलेले नाही. तरी नगरपंचायत कार्यक्षेत्र हे सीआरझेड II मध्ये वर्गीकृत होणेबाबत अध्यक्ष, जिल्हास्तरीय कोस्टल् झोन मॉनेटरींग समिती (DCZMA) यांजकडे पत्र क्र. नपंगु/508/2020 दिनांक 08/09/2020 चे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.

सदस्य सचिव यांनी प्रस्तावाबाबत जिल्हास्तरीय कोस्टल् झोन मॉनेटरींग समिती मध्ये प्रस्तावना केली. तदनंतर प्रस्तावाबाबत समितीमध्ये चर्चा करण्यात आली.

गुहागर नगर पंचायत ता. गुहागर जि. रत्नागिरी ची स्थापना दिनांक 06/10/2012 रोजी झालेली आहे. तथापि गुहागर नगर पंचायत अंतर्गत येणारे सर्व क्षेत्र हे CRZ III मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. तरी गुहागर नगर पंचायत अंतर्गत येणारे सर्व क्षेत्र हे CRZ II मध्ये समाविष्ट करणेबाबत कार्यवाही होणेकामी मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनी पत्र क्र. नपंगु/389/2017 दिनांक 14/07/2017 चे पत्रान्वये मा. संचालक, MCZMA नवी दिल्ली यांजकडे प्रस्ताव वजा विनंती अर्ज सादर केलेबाबत मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांनी अध्यक्ष यांना निदर्शनास आणून दिली.

सदयस्थितीमध्ये गुहागर नगर पंचायत अंतर्गत येणारे सर्व क्षेत्र हे CRZ III मध्ये समाविष्ट करण्यात आलेमुळे समुद्रमुखाच्या बाबतीत भरतीरेषेपासून जमिनीकडील 500 मीटरचा भूभाग हा सीआरझेड मानण्यात आला आहे व भरतीरेषेपासून जमिनीकडील 200 मीटरचा परिसर ना-विकास क्षेत्र (NDZ) म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे विकास कामे व पर्यटन उदयोग वाढविण्याच्या अनुषंगाने हॉटेल/रिसॉर्ट यांची बांधकामे करता येत नाहीत. गुहागर नगर पंचायतीचे क्षेत्र CRZ III मधून CRZ II मध्ये समाविष्ट केले गेल्यास CRZ च्या अटी शिथील होतील. असा मुद्दा मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांनी समिती समोर मांडला.

मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर यांचे संदर्भीय प्रस्ताव यांचे अवलोकन केले असता गुहागर नगर पंचायत ता. गुहागर जि. रत्नागिरी ची स्थापना दिनांक 06/10/2012 रोजी झालेली असून अदयापपर्यंत गुहागर नगर पंचायत अंतर्गत येणारे सर्व क्षेत्र हे CRZ III मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

तसेच सीआरझेडची नविन अधिसूचना दिनांक 18/01/2019 रोजी प्रसिध्द झालेली असुन प्रारुप नकाशाचे अवलोकन केले असता गुहागर नगर पंचायत अंतर्गत येणारे सर्व क्षेत्र हे CRZ III B मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. सदर अधिसूचनेपुर्वी गुहागर नगर पंचायत अस्तित्वात असलेमुळे गुहागर नगर पंचायतची मागणी रास्त असून गुहागर नगर पंचायत या कार्यक्षेत्रात येणारा सर्व भाग/क्षेत्र हे CRZ II मध्ये समाविष्ट करणे अनिवार्य आहे.

तसेच गुहागर नगर पंचायतीचे क्षेत्र CRZ III मधून CRZ II मध्ये समाविष्ट केले गेल्यास CRZ I (उदा. कांदळवन, कासव विणीचे क्षेत्र) चे क्षेत्रावर, CRZ I चे क्षेत्र अगोदरच चिन्हांकित झालेमुळे कोणताही परिणाम होणार नाही असे सदस्य सचिव यांनी सांगितले.

तरी मुख्याधिकारी यांच्या मागणीच्या अनुषंगाने गुहागर नगर पंचायत क्षेत्र CRZ III ऐवजी CRZ II मध्ये समाविष्ट करण्याचा प्राप्त प्रस्ताव मा. अध्यक्ष, MCZMA यांना सादर करणे आवश्यक असलेबाबत समितीमध्ये मंजुरी देण्यात आली आहे.

## <u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -</u>

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेलया बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहा. संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या. तसेच समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष, महाराष्ट्र सागरी किनारा प्रक्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना सादर करावे असे निर्देश देवुन व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/09/2020
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 16/09/2020

**(लक्ष्मीनारायण मिश्रा)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी**

प्रतिलिपी - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 15/09/2020 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलिस अधिक्षक रत्नागिरी | सदस्य |
| 4. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 6. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय टास्क फोर्स समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5 प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सीआरझेड अधिसूचना 1991 व 2011 च्या तरतूदींचे उल्लंघन करणा-या बाबींचे सर्व्हेक्षण करुन तरतूदींचा भंग झाला असल्यास त्यावर कार्यवाही करणेची आहे.

1. विनापरवाना बांधकाम प्रकरणे शोधणे.
2. पर्यावरण खात्याची परवानगी न घेतलेली परंतु इतर खात्याची परवानगी घेऊन पुर्ण झालेली अगर अपूर्ण बांधकामे शोधणे.
3. पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली परंतु अटी व शर्तीचा भंग झालेली प्रकरणे शोधणे.

**<u>सीआरझेड नियमांचे पालन संबंधित जमीनमालक/ जमीन विकासक यांचेकडून झाले किंवा कसे याची पाहणी पथकाकडून करुन अनुसूची अ व ब प्रमाणे माहिती सादर करण्याबाबत</u>** -

सागरी किनारी होणा-या बांधकामांचे बाबतीत वेळोवेळी प्रचलित सीआरझेड नियमांचे पालन संबंधीत जमिन मालक/ विकासक यांचेकडून झाले आहे किंवा कसे याची पहाणी करणे आवश्यक असलेमुळे या कार्यालयाकडील दिनांक 13/01/2014 च्या आदेशान्वये तपासणी पथकांची नियुक्ती करणेत आली होती. सदर पथकाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच पथकांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले -

1. पथकांमध्ये नगर रचनाकार व भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असुन तांत्रिक बाबींमध्ये त्यांचे सहाय्य घेणेचे आहे.

2. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 18 नुसार नगर परिषद नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांना नियोजन प्राधिकरण नेमलेले आहे. तरी नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांनी सीआरझेड नियमांचे उल्लंघन होते अगर कसे? याची पडताळणी करणेची आहे.
3. ग्रामीण भागातील बांधकामाचे बाबतीत उपविभागीय अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे तसेच तांत्रिक बाबीमध्ये सहाय्यक संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत.

उपविभागीय अधिकारी यांनी सर्व्हेक्षण पथकांचा अहवाल पुढील बैठकीचे पुर्वी सादर करणेचा आहे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या. तसेच समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष, महाराष्ट्र सागरी किनारा प्रक्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना सादर करावे असे निर्देश देवुन व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**(लक्ष्मीनारायण मिश्रा)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/टास्कफोर्स/09/2020
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 16/09/2020

प्रतिलिपी - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी